(१७०)

पलर - २
२४३२ / २०२१
६० — ६०

इमारत क्र.११ व १३ TYPE A१

| FLOOR | BUILT UP AREA | EXCESS BAL | TOTAL |
|---|---|---|---|
| GROUND | १६६.१६ | ०.०० | १६६.१६ |
| FIRST | १६६.०७ | ०.०० | १६६.०७ |
| SECOND | १६६.०७ | ०.०० | १६६.०७ |
| THIRD | १६६.०७ | ०.०० | १६६.०७ |
| FOURTH | १६६.०७ | ०.०० | १६६.०७ |
| TOTAL | ८३०.४४ | ०.०० | ८३०.४४ |

इमारत क्र.११ व १३ TYPE B३

| FLOOR | BUILT UP AREA | EXCESS BAL | TOTAL |
|---|---|---|---|
| GROUND | १६६.१६ | ०.०० | १६६.१६ |
| FIRST | १६६.०७ | ०.०० | १६६.०७ |
| SECOND | १६६.०७ | ०.०० | १६६.०७ |
| THIRD | १६६.०७ | ०.०० | १६६.०७ |
| FOURTH | १६६.०७ | ०.०० | १६६.०७ |
| TOTAL | ८३०.४४ | ०.०० | ८३०.४४ |

१. तत्कालिन अपर जिल्हाधिकारी,ठाणे मुख्यालय जव्हार यांचेकडील आदेश क्र.महसूल/कक्ष-१/टे-१अ/एनएपी/एसआर-१९२/२०१२ दि.१३/५/२०१३ अन्वये देणेत आलेल्या बिनशेती व बांधकाम परवानगी आदेशातील अटी व शर्तीचे पालन करणे अर्जदार/वास्तुविशारद/ विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

२. मंजुर बांधकाम नकाशा व्यतिरिक्त नंतर जादा बांधकाम केल्याचे आढळून आल्यास कायदेशिर कारवाई करणेत येईल.

३. इमारतीमध्ये अंतर्गत व बाहय बदल करावयाचे झाल्यास ती नियोजन प्राधिकरणाची पूर्व परवानगी घेऊन बदल करणे आवश्यक आहे.

४ केलेल्या बांधकामाचा दर्जा निकृष्ट असल्यास व एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी नियोजन प्राधिकरणाची राहणार नाही.

५. नियमानुसार सोडावयाच्या समास अंतरामध्ये कमीत कमी १२ ते १५ झाडे लावून जोपासण्यात यावी.

६. सांडपाणी व्यवस्थेबाबत भविष्यात काही वाद उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहील.

७. सदर बांधकामाचे सक्षमतेबाबत संबंधित आर्किटेक्ट, इंजिनिअर जबाबदार राहतील.

८. सदर इमारतीचे चहू बाजूने सोडावयाचे सामासिक अंतरामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम अथवा बांधकामाचे प्रोजेक्शन करता कामा नये.

९. पार्किंगसाठी खुले सोडण्यात आलेले क्षेत्र हे कायमस्वरूपी खुले ठेवण्यात यावे.

१०. मालकी हक्काबाबत काही वाद उद्भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदार यांची राहील.

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR

जिल्हाधिकारी पालघर
सत्यमेव जयते
जिल्हा पालघर

(डॉ.प्रशांत नारनवरे)
जिल्हाधिकारी पालघर

पलर - २
२५३२ / २०२१
५८ — ९०

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पालघर यांचे कार्यालय

पार्श्वनाथ- ९, विडको नाका, माहिम, ता. जि. पालघर
दूरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११ ई-मेल - collectorpalghar@gmail.com

क्र.महसूल/कक्ष.१/टे.१/भोगवटा प्रमाणपत्र/एसआर- ०६/२०१८ दिनांक :- /१२/२०१८
26 DEC 2018

**परिशिष्ट 'I'**

**भागश : भोगवटा प्रमाणपत्र**

**(FORM FOR PARTLY OCCUPANCY CERTIFICATE)**

**प्रति,**

**डायरेक्टर, मे.सत्य लाईफ स्टाईल प्रा.लि.,**
**पत्ता :- स.नं.३/१, २ व ४, शेलवली,पालघर मनोर हायवे, पालघर पूर्व**

मौजे शेलवली,ता.जि.पालघर स.नं.३/१,३/२,३/४ पैकी क्षेत्र ३५,६५५.५२ चौ.मी., सर्व्हे क्र.३/१ पैकी क्षेत्र ४५६४.४८ चौ.मी. व सर्व्हे क्र.३/४ क्षेत्र ०.०२.५ हे.आर. असे एकुण एकत्रित क्षेत्र ४०,४७०.०० चौ.मी. जमिनीस तत्कालिन अपर जिल्हाधिकारी, ठाणे मुख्यालय जव्हार यांचेकडील आदेश क्र.महसूल/ कक्ष-१/टे-१अ/ एनएपी/ एसआर-१९२/२०१२ दि.१३/५/२०१३ अन्वये अट क्र.१ ते ६१ चे अधीन राहून मे.सत्य लाईफ स्टाईल प्रा.लि.तर्फे श्री.ओम रमेश सावंत, रा.शेलवली, ता.पालघर यांना सुधारित बांधकाम परवानगी देणेत आलेली आहे.

प्रकरणी आपण दिनांक २१/०४/२०१८ चे अर्जान्वये भागश: भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्याअनुषंगाने सहायक संचालक, नगररचना, पालघर यांचेकडील पत्र क्रमांक जा.क्र. ससंनर-पालघर शाखा/मौ.शेलवली/ता.पालघर/ स.नं.३/१,२व४/ भोगवटा प्रमाणपत्र/१०५७ दि.११/६/२०१८ अन्वये भोगवटा प्रमाणपत्र देणेबाबत या कार्यालयाकडे शिफारस केलेली आहे.

सदर शिफारशीनुसार, मौजे शेलवली,ता.जि.पालघर स.नं.३/१, २ व ४ क्षेत्र ४०,४७०.०० चौ.मी.या जागेवरील एकुण १ ते १८ इमारती पैकी इमारत क्र.११ व १३ टाईप A-१ व B-३ या इमारतीचे बांधकाम श्री.निलेश एच.बारिया, वास्तुविशारद (परवाना क्र.CA/०७/४०६११, मुदत दि.३१/१२/२०२८) व डॉ.एच.एम.राजे, संरचना अभियंता (परवाना क्र.STR/R/२५, परवाना मुदत दिनांक ३१/०३/२०२०) यांचे पर्यवेक्षणाखाली पूर्ण केले असल्याने भोगवटा प्रमाणपत्र देणेबाबत सहायक संचालक, नगररचना, पालघर यांनी या कार्यालयाकडे शिफारस केली आहे. त्यानुसार खालील तक्त्यात नमुद इमारत क्रमांक व क्षेत्राबाबत खालील अटी व शर्तीवर भागश: भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित करणेत येत आहे.